| | नियमित दिवाणी दावा क्र.३०४/२०२१ नि.क्र.४७ वरील आदेश<br>(अधिघोषीत दिनांक ०३ मे, २०२४)<br>**गुलाबसिंग – वि.– अंगद + १**<br>CNR No. MHLA060013932021 |
|---|---|

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुध्द निशाणी क्र.०१ खाली झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द होण्यासाठी सादर केला आहे.

**०२.** प्रतिवादींचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुत प्रकरणात दिनांक ०२.०२.२०२४ रोजी त्यांचे नातेवाईकांचे अंत्यविधीसाठी बाहेरगावी गेले असल्यामुळे ते मा. न्यायायालमध्ये हजर राहून त्यांचा पुरावा दाखल करु शकले नाही. म्हणून दिनांक ०२.०२.२०२४ रोजी मा. न्यायालयाने प्रतिवादींचा पुरावा बंदचा आदेश पारीत केला. प्रतिवादींनी जाणीवपुर्वकपणे किंवा निष्काळजीपणे पुरावा देण्यास टाळाटाळ केली नसून वर नमुद कारणामुळे त्यांनी त्यांचा पुरावा दाखल करु शकले नाही. सदर प्रकरणात प्रतिवादीं व टेंभुर्णी येथील गावकऱ्यांचा मुल्यवान हक्क गुंतलेला असून दावा मिळकत ही शासनाची खुली जागा आहे. त्यामुळे प्रतिवादींविरुध्द पुरावा बंद असा पारीत झालेला आदेश रद्दबातल करणे न्यायाने योग्य राहिल. करिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** वादीतर्फे सुविद्य विधिज्ञ यांनी प्रस्तुत अर्जास लेखी म्हणणे सादर केले आहे आणि असे कथन केले आहे की, सदर अर्जातील नमुद कारण खोटे आहे. प्रतिवादी यांनी जाणीवपुर्वक सदर प्रकरण प्रलंबीत ठेवण्याच्या उद्देशाने यापुर्वी निशाणी ४४, ४५ व ४६ वर अर्ज दिले होते. म्हणून सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

**०४.** प्रतिवादींतर्फे व वादीतर्फे त्यांच्या सुविद्य वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

## कारणमिमांसा

**०५.** सदर प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्ज हे निरंतर मनाई हुकूम मिळणेबाबत दाखल केला आहे. अभिलेखावरुन असे दिसून येत आहे की, दिनांक ०५.०६.२०२३ रोजी प्रस्तुत प्रकरणात निशाणी क्र.२३ वर वादमुद्दे निश्चीत करण्यात आले. त्यानंतर दिनांक ०१.१२.२०२३ रोजी प्रस्तुत प्रकरणात वादीचा पुरावा झाल्यानंतर त्यांच्यातर्फे पुरसीस दाखल करुन पुरावा बंद करण्यात आला. त्यानंतर दिनांक १२.१२.२०२३ पासुन प्रस्तुत प्रकरण प्रतिवादींच्या पुराव्यासाठी प्रलंबीत होता. दिनांक १६.०१.२०२४ रोजी प्रतिवादींतर्फे पुराव्यासाठी मुदतीचा अर्ज अंतिम संधीसह मंजूर करण्यात आला. प्रतिवादींना पुरेशी संधी देवूनही त्यांनी त्यांच्यातर्फे पुरावा दाखल केला नाही. म्हणून दिनांक ०२.०२.२०२४ रोजी प्रतिवादींविरुध्द पुरावा बंद असा आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर दिनांक १७.०२.२०२४ रोजी प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज सादर केला आहे. दरम्यानच्या काळात प्रतिवादींतर्फे कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल

करण्यात आला नाही. प्रतिवादीं यांनी असे कथन केले आहे की, त्यांचे नातेवाईकांचे अंत्यविधीसाठी बाहेरगावी गेले असल्यामुळे त्यांनी त्यांचा पुरावा दाखल करु शकले नाही. परंतु अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, पुरेशी संधी देवूनही प्रतिवादींनी त्यांच्यातर्फे कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे असे स्पष्टपणे दिसून येते की, प्रतिवादीं यांनी सदर प्रकरणात पुरावा देण्यासाठी विलंब केलेला आहे.

**०६.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरण हे निरंतर मनाई हुकूम बाबत दाखल केला असून दोन्ही पक्षांचे अचल संपती बाबत निर्णय होणार आहे. तसेच प्रतिवादीं यांनी केलेल्या कथनाची सत्यता पडताळून पाहण्यासाठी त्यांना त्यांच्यातर्फे पुरावा देण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर झाल्यास वादी याचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीं यांना त्यांचा पुरावा देण्याची संधी मिळणे न्यायोचीत आहे. तसेच प्रतिवादीं यांनी केलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर खर्च बसविणे आवश्यक आहे. विलंबाचा कालावधी पाहता प्रतिवादीं यांच्याविरुध्द रु.६००/- (प्रत्येकी रु.३००/-) खर्च बसविणे योग्य राहिल.

**आदेश**

१) प्रस्तुत अर्ज रु.६००/- (प्रत्येकी रु.३००/-) खर्च बसवुन मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादीं यांनी खर्चाची रक्कम रु.६००/- हे वादी यांना द्यावी व पुढील तारखेस न चुकता त्यांच्यातर्फे पुरावा दाखल करावा.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KANCHANKAUR GADIWALE
Date: 2024.05.03 17:36:48 +0530

ठिकाण : - अहमदपूर.
दिनांक :- ०३.०५.२०२४.

**(के.बी. गाडीवाले)**
सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
(कोर्ट नं.०४, अहमदपूर).